लो रामनवमी विशेष



# समर्थ रामदास स्वामी मठ, आगरटाकळी

**१६०८ साली** रामदास स्वामींचा जन्म झाला, वयाच्या १२ व्या वर्षी रामदास स्वामींचा विवाह ठरला तेव्हा रामदास स्वामींनी लग्नमंडपातून पळ काढून थेट नाशिक येथील टाकळी येथे आले. रामदास स्वामींना हा निसर्गरम्य परिसर आवडल्याने त्यांनी येथेच राहणे पसंत केले. येथे वास्तव्यास असताना भिक्षा मागून त्यांचा उदरनिर्वाह चालत असे. टाकळी येथील मठात रामदास स्वामींनी तपश्चर्या केली तसेच नदीच्या संगमावर तब्बल एक तप उभे राहून सलग १३ कोटी राम नामाचा जप केला आहे. याकाळात रामदास स्वामींनी संस्कृतमध्ये रामायण लिहिले असून याची प्रत आजही या ठिकाणी बघायला मिळते. त्याकाळात टाकळी येथे राहणारे कुलकर्णी नामक गृहस्थ वारल्याने त्यांची पत्नी सती जायला निघालेली असताना तिने समाधी अवस्थेत असणाऱ्या रामदास स्वामींचे दर्शन घेतले. स्वामींचे चरणस्पर्श करताना बांगड्यांचा आवाज झाल्याने रामदास स्वामींच्या समाधीत खंड पडला आणि त्यांच्या तोंडून 'सौभाग्यवती भव' असे आशीर्वादरुपी वचन बाहेर पडले. आजूबाजूच्या लोकांनी स्वामींनी दिलेला आशीर्वाद ऐकल्याने त्यांनी दैवी कृपा म्हणून मृतावस्थेत पडलेल्या कुलकर्णींच्या मुखात नदीचे जल टाकले आणि राम नामाचा जप केल्याने मृतावस्थेतील कुलकर्णी जिवंत झाले. यानंतर रामदास स्वामींनी या दाम्पत्यास अष्टपुत्र प्राप्तीचा आशीर्वाद दिला परंतु त्यांना दहा अपत्ये झाली आणि पहिला मुलगा देवाच्या सेवेसाठी द्यावा असे सांगितले, यावरुन त्यांचे नाव दशपुत्रे असे झाले आणि देवाच्या सेवेत दिलेल्या मुलाचे नाव उद्धव स्वामी असे होते.



◆ रामदास स्वामींची तपश्चर्या पूर्ण झाल्यानंतर त्यांना प्रभू रामचंद्र, हनुमान यांच्या दर्शनाची आणि भारत भ्रमणाची आज्ञा झाली. संपूर्ण भारतभरात रामदास स्वामींनी ११०० मठ स्थापन केले असून या मठ स्थापनेची सुरुवात नाशिकपासून करण्यात आली होती. १६३३ मध्ये चैत्र पौर्णिमा अर्थात हनुमान जयंतीला रामदास स्वामींनी गायीच्या शेणापासून मारुतीची मूर्ती बनवली असून ही मूर्ती आजही या मठात बघायला मिळते.